जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ८६४ दिनांक - १३/१२/२०२३

पीसीबी गुन्हे शाखा,पुणे शहर

**चतु:श्रृंगी पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे पोलीस आयुक्तालयातील चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **आदित्य उर्फ राज कुमार मानवतकर, वय २० वर्षे रा. अग्निशमन केंद्राचे मागे, संजय लगाडे यांचे घराशेजारी, गणपती मंदिराजवळ, संजय गांधी वसाहत, लमाण तांडा, पाषाण पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह **चतु:श्रृंगी** पोलीस स्टेशनच्या हद्दीत अग्निशस्त्र, कोयता, चाकू या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह खुनाचा प्रयत्न,दंगा,बेकायदेशीर अग्निशस्त्र, शस्त्र बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ५ वर्षामध्ये त्याचे विरूध्द ३ गंभीर गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री. रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री. बालाजी पांढरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चतुश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे, श्री. चंद्रकांत बेदरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पुणे शहर यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी चालु वर्षामध्ये दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ६८ कारवाया केल्या आहेत.** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.